# ऋणनिर्देश


शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. शिक्षणशास्त्र या पदवीच्या पूर्तीसाठी संशोधन कार्य पार पाडताना, सतत प्रोत्साहन देणारे प्राचार्य प्र. ल. नानकर, व प्राचार्या नजमा मणेर यांची संशोधिका ऋणी आहे.

या संशोधन कार्यात संशोधन पध्दती व अहवाल लेखनशास्त्र संदर्भातील सखोल मार्गदर्शन डॉ. ब. आ. कोळपे यांच्याकडून लाभले. संशोधन कार्य करताना प्रा. के. द. गायकवाड यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळेच संशोधनाचा अखेरचा टप्पा गाठणे शक्य झाले. माझे सहकारी प्रा.श्री. बी. आर. आदिक व प्रा. ए. एस्. रविकीर्ती यांनी आपला वेळ देऊन या कार्यास हातभार लावला. या निमित्ताने संशोधिका या सर्वांचा अंत:करणपूर्वक ऋणी आहे.

या संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती देणारे व प्रत्यक्ष कार्यक्रमाला मदत करणारे शिरसगावचे सरपंच, ग्रामसेवक, आरोग्यसेविका, अंगणवाडी सेविका व माझे गावातील तरूण विद्यार्थी कार्यकर्ते धनंजय मलाव, अशोक कर्णे व मितेश ताके या सर्वांच्या ऋणांचा निर्देश संशोधिका करीत आहे. माझे पती डॉ. सुनिल नेने व श्रीरामपूरातील विविध स्वयंसेवी संस्था, डॉ. अलका तेरकर या सर्वांची अमूल्य मदत मिळाल्यामुळेच विविध कार्यक्रम राबविणे शक्य झाले. तसेच शिरसगावातील महिलांनी दिलेल्या प्रतिसादामुळेच संशोधन कार्याची कार्यवाही करणे शक्य झाले. या सर्वांचा ऋणनिर्देश टाळणे कृतघ्नता ठरेल.

या संशोधन अहवालास सुबक व आकर्षक रूप देण्याची जबाबदारी श्री. चंद्रात्रे वाय. व्ही. यांनी समर्थपणे पेलली या निमित्ताने संशोधिका त्यांचाही ऋणी आहे.

या शिवाय अनावधानाने राहिलेल्या सर्व व्यक्ती व संस्थांचा संशोधक ऋणी आहे.

सातारा.

दिनांक : जून १९९९.

एम्. जी. लारकर.